# 'खाऊजा' नंतर मराठवाडयातील ग्रामीण कादंबरी: वास्तव दर्शन

**प्रा. लक्ष्मण आर. लोकलवार**
नराश्याम उच्च माध्यमिक विद्यालय , रातोळी
E-mail- lokalwar51@gmail.com
mob.no. – 9403012951

---

**प्रास्ताविक :**

मराठी साहित्यात ग्रामीण जीवन संस्कृती विचारधारा ग्रामीण जाणीवा ग्रामीण प्रश्न यावर आधारीत भरपूर साहित्य लेखन झाले आहे म. फुले यांनी गुलामगिरी,शेतकऱ्यांचा आसूड , तृतीय रत्न , अखंड लेखनाच्या माध्यमातून ग्रामीण साहित्याचा पहिला सशक्त आविष्कार केला . त्यानंतर कृष्णराव भालेकर मुकुंदराव पाटील, धनुर्धारी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी ग्रामीण साहित्य प्रवाहाचा पाया भक्कम केला या सर्व लेखकांनी 1920 पूर्वी शेती, शेतकरी जीवन , ग्रामीण जीवनातील शोषण, समस्या यासंबंधीच्या प्रगल्भ जाणीवा आपल्या साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला.

1920 ते 1945 पर्यंत श्री. म. माटे ,श्रीधर व्यंकटेश केतकर , कवी यशवंत गिरीश, ग.ल ठोकल ,ग. ह. पाटील, नारखेडे, सोपानदेव चौधरी, र.वा दिघें आदी लेखक कवींनी आपल्या प्रतिभेच्या साह्याने ग्रामीण साहित्यात भर घातली, परंतु या कालखंडातील बहुतांश ग्रामीण साहित्यातील लेखन ग्रामीण वास्तवापेक्षा वास्तवाभास निर्माण करणारे होते .अर्थातच ते स्वप्नरंजनाकडे झुकलेले होते.या कालखंडातील मोजकेच साहित्यिक ग्रामीण जीवनानुभूतीचा वास्तववादी आविष्कार करू शकले . बाकी स्वप्नरंजनाचाच भाग होता.

1945 नंतर मात्र व्यकटेश माडगुळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार , रणजित देसाई यांनी ग्रामीण साहित्याला रंजनपरतेतुन वास्तवात आणण्याचा प्रयत्न केला . त्यांच्या साहित्यात ग्रामीण वास्तवाच्या मांडणीला प्राधान्य होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणाची दार सर्वांना खुली झाली .त्यामुळे आपल्या जीवन जाणिवा अधिक वास्तव स्वरूपात मांडणारी लेखक मंडळी पुढे आली परिणाम स्वरूप 1960 नंतर मात्र हे साहित्य अधिकाधिक ग्रामीण वास्तवाच्या सत्याच्या जवळ आल्याच्या प्रत्ययाला येते.

यापूर्वीचे काही लेखक व या कालखंडातील उध्द्व शेळके, आनंद यादव, मनोहर तल्हार, रा.र .बोराडे, सखा कलाल , ना, धो . महानोर , दत्ता भोसले , चारुता सागर, चंद्रकुमार नलगे इत्यादी लेखकांनी ग्रामीण माणसांच्या मूलभूत जाणिवा व्यक्त करतानाच ग्रामीण वास्तव त्यांचे भावविश्व मांडले .काही लेखकांनी खेड्यात आलेली यंत्रे, विज्ञानाचा झालेला प्रसार व त्यातून बदललेले ग्रामीण जीवन याचा वारूववादी आलेख आपल्या कलाकृतीन रेखाटलेला आहे .1970-75 नंतर ग्रामीण साहित्याची एक चळवळच उभीराहिली.या काळातील लेखकांनी म.फुले ते डॉ .बाबासाहेब आंबेडकर या परंपरेतील विचारवंतानी जी मीमांसा केली होती व त्यातून ग्रामीण साहित्याचे जे तत्वज्ञान पुढे आले होते. त्या तत्वज्ञानाच्या परंपरेशी स्वतःला जुळवून घेण्याचा प्रयत्न केला . आणि साहित्य लेखन केले म्हणून या काळातील ग्रामीण साहित्य लढाऊ आक्रमक प्रकृतीचे बनलेले दिसते. अर्थात या काळातही ग्रामीण साहित्याचे स्वरूप थोडे बदललेले दिसते की, , आनंद यादव. भीमराव वाघचौरे, भास्कर चंदनशीव, बी.रघुनाथ , रा.रं. बोराडे ,वासुदेव मुलाटे, श्रीराम गुंदेकरकर, विठ्ठल वाघ. बाबाराव मुसळे, आनंद पाटील, शेशेराव मोहिते,

श्रीकांत देशमुख ,इंद्रजीत भालेराव , प्रतिमा इंगोले अशा कितीतरी लेखकांनी याकाळात ग्रामीण जीवनाचे बहुविध चित्रण केले आहे .

**नव्वद नंतरचे मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यातील भावविश्व, ग्रामीण जाणीवा :**

1990-91 नंतर मराठी ग्रामीण साहित्य लेखनातून पृथगात्म जाणिवा येऊ लागल्या कारण तत्काळाचा प्रभाव ग्रामीण भागात उमटू लागला. 1991 ला गॅट करारानुसार भारताने जागतिकीकरणे धोरण स्वीकारले 'खाऊजा' संस्कृती चा उदय भारतात होऊ लागला. त्याचा परिणाम ग्रामीण जीवनावरही झाला .खाऊजा संस्कृतीमुळे ग्रामीण जीवन चांगले कमी व वाईट परिणाम जास्त झाले.

देशी व विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यानी शेतक-याच्या जमिनी काबीज केल्या शेतकरी भूमीहीन होऊ लागला. दलालाकडून शेतकयांची फसवणूक झाली, शेतीमालाला मिळणारा अल्पभाव, वाढती महागाई खत बी बियाणे फवारण्या यामुळे शेतीतील वाढलेला खर्च व उत्पादन यातील तफावत, वाढती बेकारी, लोडशेडिंग, गावातील बदलते राजकारण, नीतीमूल्याचा घसरलेला दर्जा, भूक अशा विविध पातळ्यावर ग्रामीण माणसाला संघर्ष करावा लागू लागला, खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकरण संस्कृतीने निर्माण केलेल्या समस्या व काही समकालीन जाणिवा प्रश्न विश्व 1991 नंतरच्या ग्रामीण साहित्यातून आविष्कृत केल्या जाऊ लागल्या . ग्रामीण कथा, कविता कादंबरी व अन्य वाङमय प्रकारात ही . याचे प्रतिबिंब दिसते . 1 9 9 1 नंतर जुन्या पिढीतील लेख कवी बरोबरच नव्या पिढितील कवी लेखकांनी तत्कालीन वास्तवाले चित्र रेखाटणारे साहित्य लिहलेले आहे.

**मराठवाड्यातील नव्वद नंतरची ग्रामीण कादंबरी व त्यातील चित्रण :**

मराठवाड्यातील आजच ग्रामीण जीवन व्यामिश्र स्वरूपाचे आहे . आधुनिकतेच्या रेट्याखाली इथले ग्राम जीवन समूळ बदलून गेलेले दिसते . परंपरा व नवता , आधुनिकता यांचा संमिश्र भाग येथे अनुभवास येतो. शेती व्यवसाय असला तरी त्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापूर, कीटकनाशके , बी बियाणे यामुळे वाढलेला खर्च शेतीमालाला मिळणारा अल्प भाव व शेती वरिल अस्मानी संकट वाढलेली महागाई, शासनाची शेतकऱ्या बाबत उदासिनता, दारिद्रय बेकारी, वाढती चंगळवादी प्रवृत्ती सावकारी पाश ,शेतक-यांच्या वाढलेल्या आत्महत्या, शेतीपासून नव्या पिढीच तुटत जाणं, वाटणी, कुटूंबा संस्थेला गेलेले तडे, ग्राम जीवनात आलेले राजकारण जागतिक वातावरण व त्याचा ग्रामजीवनावर होत असलेला परिणाम याचं प्रतिबिंब मराठी साहित्यात चित्रीत झाल .त्यास मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरी तरी कशी अपवाद ठरेल! या सर्व जाणिवा मराठवाड्यात नवदनंतर लिहिणाऱ्या ग्रामीण कादंबरीकारांच्या कादंबरीतून प्रत्ययाला येतात.

1990-91 नंतरच्या कालखंडात मराठवाड्यातील ग्रामीण कादंबरीकारामध्ये ज्यांनी दमदार ग्रामीण कादंबरी लेखन केले आहे ते रा.र .बोराडे (रहाटपाळणा रिक्त अतिरिक्त ) बाबू बिरादार ( कावड संभूती ) प्रकाश देशपांडे - केजकर ( बारदाना ) शेषेराव मोहिते ( अस जगण तोलाचं, ) डॉ. वासुदेव मुलाटे (विष वृक्षाच्या मुळ्या) गणेश आवटे (गणगोत, पाणसळ , भिरुड ) नागनाथ पाटील (कोड़ाणातलं जिण, लंबाडी ), भीमराव वाघचौरे (पाणघळी, गराडा, अंगारकुस ), भारत काळे ( ऐसे कुणबी भुपाळ ) बालाजी मदन इंगळे ( झिम पोरी झिम) अशा आणखी काही निवडक कादंबरीकारांचा नामोल्लेख करता येईल . मुळ चे लातूर येथील रहिवाशी आणि सध्या औरंगाबाद येथे राहणाऱ्या रा.र. बोराडे यांनी 19 91 नंतरच्या काळात जवळपास सहा कादंबऱ्या लिहिल्या.त्यातील "रिक्तअतिरिक्त" हि कादंबरी आर्थिकदृष्ट्या रिक्त असलेल्या शेतक-यांच्या विविध प्रश्नांचा वेध घेणारी एक लक्षणीय

कादंबरी आहे. कादंबरीचा नायक नाथाप्पा व त्याचे कुटुंब या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे.

अलिकडच्या काळात मराठवाड्यातील शेतकरी पारंपारिक पिकाबरोबरच ऊसाचे पिक घेऊ लागला. तसा नाथप्पा हासुध्दा ऊस पिकणारा ऊस मालक परंतु सहकार क्षेत्रात विशेषतः साखर उद्योगातील राजकारण व भ्रष्टाचार यामुळे त्याचा अतिरिक्त झालेला ऊस परिणाम स्वरूप डोनेशन या कारणावरून मुलगा केदार आणि नाथप्पा यांच्यामध्ये निर्माण झालेले संघर्षाचे वातावरण , त्यातून त्यांच्या जीवनात निर्माण झालेले कारुण्य याचे मन सुन्न करणारे चित्रण लेखन केले आहे.

देगलुर येथे वास्तव्यास असलेली बाबू बिरादार हे सीमावर्ती भागात राहूनही मराठी साहित्यात कसदार व दमदार लेखन करणारे एक महत्वपूर्ण नाव त्यांच्या अग्निकाष्ट , कावड , अंत:पुरण, संभुती घ्या मराठी साहित्याच्या क्षेत्रात गाजलेल्या  कलाकृती त्यांची संभूती ही कादंबरी भीमाबाई, तानी, हुलाबाई या स्त्रियांचा व्यवस्थेविरुद्ध संघर्ष मांडता मांडता रात्र दिवस काबाडकष्ट करणाऱ्या पिकाशी मातीशी हितगुज साधणाऱ्या स्त्रीव्यक्तिरेखा त्यांनी चित्रित केल्या आहेत, स्त्री प्रश्नाबरोबरच ग्रामजीवनाचं वास्तव चित्र या कादंबरीत प्रत्ययाला येत. प्रकाश देशपांडे-केजकर यांनी  बारदाना' या कादंबरीतून रावसाहेब या व्यक्तिरेखेचे शेत शिवार राना-ब व णावर असलेले विलक्षण प्रेम दाखवता नाच  बदलत्या काळासोबत जुळवून घेतान जमीनदार कुटुंबातील सदस्यांची होणारी फरफट त्यांचा उसवलेला बारदाना या चे वास्तववादी चित्रण रेखाटले आहे.

विजय जावळे यांनी आपल्या लेकमात या कादंबरीतून बीड जिल्हयातील ऊसतोड कामगारांचं जीवन त्यांच्या जीवनातील विविध प्रश्न यावर प्रकाश टाकलेला आहे.भाऊबंध, चारखणी याही त्यांनी लिहलेल्या कांदबऱ्या लक्षणीय आहेत. जागतिकीकरणानंतर ग्राम जीवनातही अमुलाग्र बदल झाला . विकासाच्या व प्रगतीच्या आणि सुधारणेच्या गोडस नावाखाली फसवणूक सुरु झाली माणसे बदलली, माणसाची मनेही संकुलित झाली . एकंदरीतच गावाला बकालपणाचे स्वरूप प्राप्त झाले. गावात शिरलेले राजकारण हेवेदावे, अंधश्रद्धा , सुडबुद्धी , दडपशाही या सर्व बाबींचा वास्तवदर्शी चित्र लेखकाने 'चारखणी'  या कादंबरीतून रेखाटलेल आहे. बा.पु.गव्हाणे या शेतक-याची झालेली वाताहत मन हेलावून टाकणारी आहे.

'गव्हाणी' या कादंबरीतून सौ. शांता जोशी यांनी बीड, जालना , उस्मानाबाद या दुष्काळी भागातून ऊसतोडणीस गेलेल्या वेगवेगळ्या जातीतील कुटुंबातील मुलांचे भावविश्व शिक्षणाच्या माध्यमातून चितारले आहे. लातूर येथे स्थायिक असलेले शेषराव मोहित यांच्या 'असं जगणं तोलाच' व 'धुळपेरणी' ह्या नव्वदोत्तर काळातील दोन महत्त्वपूर्ण कादंबऱ्या असं जगणं तोलाच मधून ग्रामजीवन चित्रीत झाले आहे .खेड्यामध्ये सावकारी पाशाच्या प्रवृतीतून शेतकऱ्याची होत असलेली पिळवणूक, त्याचबरोबर शेतकरी कुटुंबात शिकून सवरून नोकरीला लागल्यावर आपल्या सर्व कुटुंबाला उन्नतीकडे घेऊन जाण्याची धडपड करणारा तरुण या कादंबरीत पाहावयाला मिळतो. त्यातील हारिबा व कासाबाई, ह्या व्यक्तिरेखा लक्षवेधी आहेत .'धुळपेरणी' मधून मोहिते यांनी ग्रामसंस्कृती ग्रामजीवन रेखाटता रेखाटता सुशिक्षित तरुणांच्या मनात होत चाललेला बदल विशेषता शेतीवर प्रेम करणारा श्रीराम शेतीपासून दूर जाऊ पाहतो हे अलिकडच्या काळातील वास्तवरूपाचे चित्रण केले आहे. श्रीराम या नायकाचा प्रवास हा एक कुटुंबाचा अथवा एका गावाचा न राहता तो संपूर्ण ग्रामीण व्यवस्तेचा ठरतो .

जवळा बाजार येथे राहणारे भारत काळे यांनी 'ऐसे कुणबी भूपाळ ' च्या माध्यमातून काशीनाथ व विश्वनाथ या दोन भावातील सत्ता संघर्ष टोकाच्या पातळीवरून दाखवलेला आहे. दोन भावातील सत्तासंघर्ष पाहताना आई

द्वारकाबाई मात्र हतबल होते. द्वारकाबाई या घराला सांभाळण्याचा प्रयत्न करतं पण त्यात तिला यश येत नाही.एकंदरीत शेतकरी कुटुंबातल्या नात्याचा पीळ, भोगवाद,अहंकार, व्देष, मोठेपणा, सत्तासंघर्ण कर्जबाजारीपणा,आदी बाबीना स्पर्श करून बाळाजी पाटलाच्या घराची झालेली वाताहात ऐसे कुणबी भूपाळ मधून दाखवलेली आहे. डॉ. वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या' या कादंबरीन सहकार क्षेत्राला लागलेली कीडा व त्याला शेतकरी जीवनावर होत असलेला परिणाम वास्तव पातळीवर मांडलेला आहे, सूरदर पाटील यांची 'चिखलवाट ही एक ग्रामीण साहित्यात उल्लेखनीय असलेली व कृषीनिष्ठ जीवनाचाचा प्रगल्भ आविष्कार करणारी महत्वपूर्ण कादंबरी या कादंबरीतील अर्जुन संघटनेचे काम करणारा पण त्याला स्वतःच्या वडिलाकडून म्हणजे आबा कडून  विरोध होतो, त्यांना संघटनेचे काम म्हणजे फुकटच्या पुढारक्या वाटतात . अर्जुनची शेतीतील कामे वेळेवर होत नाहीत. परिणामस्वरूप शेती उत्पादनात घट होते, त्यातून अनेक प्रश्नांचा कोंडाळ त्याच्या जीवनात निर्माण होतो . शेतीव्यवस्थेची होणारी पडझड व शेतकरी मनाची अस्वस्थता ' चिखलवाटा' मधून सूक्ष्म पातळीवर सुरेंद्र पाटील यांनी चित्रित केली आहे .

गणेश आवटे यांनी गणगोत, पांनसळ ,भिरूड अधिक कादंबऱ्या लिहिल्या .त्यातील भिरूड या कादंबरीत खेड्यात झालेल्या बदलांचे माणुसकीचे होत असलेले अध:पतन त्यातून झालेली ग्रामीण जीवनाची पडझड याचे दाहक वास्तव चित्र मोठ्या ताकदीने रेखाटले आहे. ग्रामजीवनात वाढलेले राजकारण त्यामुळे समाज जीवन व शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेले प्रश्न वाढलेली जातीयता, मत्सर, माणसातील लालसा अशा विविध प्रवृत्ती व त्या प्रवृत्तीच्या व्यक्तीरेखा या कादंबरीत साकारलेल्या आहेत . अशा विविध प्रवृत्तीचे रंग दामू बापूराव पाटील, मथुरा, प्राध्यापक जालिंदर चाटे, रेखा ,बालाजी बागूल आदी व्यक्तिरेखांच्या माध्यमातून प्रत्ययाला येतात .

बालाजी मदन इंगळे यांनी 'झिम पोरी झिम' ही कादंबरी लिहिली आणि मराठी साहित्याच्या क्षेत्रातही आपला एक पृथगात्म ठसा उमटवला. खेड्यात मुली शिकल्या नोकरीला लागल्या तरी त्यांच्या जीवनातला संघर्ष कमी झाला नाही. याचे वास्तववादी प्रत्यकारी लेखन त्यांच्या कादंबरीत आढळते. भीमराव वाघचौरे यांनी पानघळी, गराडा,अंगारकुस यासारख्या कादंबरी लिहुन नव्वद नंतरच्या ग्रामीण साहित्यात मोलाची भर घातली आहे. तातल्या त्यात त्यांच्या 'रानखळगी' नंतर 'गराडा' ही शेतक-या शोषणाची त्यातल्या सायबू या नायकाच्या मनाची अस्वस्थता तगमग प्रत्ययकारीकपणे मांडणारी एक महत्वपूर्ण कादंबरी ठरते. सध्याच्या स्थितीमध्ये नैसर्गिक आपत्तीच्या बियाणे, औषधे, व्यापाऱ्याकडून होणारी लुबाडणूक शासनाची उदासिन भूमिका या सर्वांच्या गराड्यात सापडलेला शेतकरी व त्याची शेती याचे प्रत्ययकारी चित्रण लेखकाने या कादंबरीतून केलेला आहे.

**समारोप :**

1990-91 नंतर चे मराठवाड्यातील ग्रामीण साहित्यात शेतकरी कुटुंबाची होत असलेली फरकट, खाऊजा धोरणाचा शेतकरी जीवनावर झालेला परिणाम शेतकयांच्या आत्महत्या, खेडयात आलेले राजकारण, आधुनिक तंत्रज्ञान तंत्रज्ञानाचा वाढता वापर, बदलत चाललेल ग्रामजीवन, संकुचित बनत चाललेली मने अशा विविध जाणिवांचा वास्तववादी आविष्कार मराठवाडी बोलीतून अभिव्यक्त होताना दिसतो.

**संदर्भग्रंथ :**

- कसाब मारोती , मुंढे अनिल ( 2021) 2000 नंतरची कविता स्वरूप व आकलन , सिद्धी पब्लिकेशन हाऊस ,नांदेड

- फडके भालचंद्र ( 1980) मराठी लेखक: चिंता आणि चिंतन , विद्या प्रकाशन , पुणे .
- मुलाटे वासुदेव ,( 1996) संपादकीय प्रस्तावना - ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही , मेहता प्रकाशन , पुणे :
- देशमुख गणेश, (2012) 1980 नंतरची मराठी ग्रामीण कांदबरी , अरुणा प्रकाशन , लातूर .
- भोसले तनुजा,(2010 ) मराठी भाषा साहित्य , समाज आणि संस्कृती , दिबोई प्रकाशन , सिंधुदुर्ग : प्रथमावृत्ती पृ क्र . 70.